सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय वाजराबाद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक: 02462-244474, 234255 फॅक्स क्र 02462-235103
E mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

पीआरओ तळमजला खोली क्रमांक -17
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड-431601

# प्रेसनोट

**दिनांक** : 02.09.2025

## डिजे मुक्त पर्यावरणपूरक उत्सव साजरे करुन नांदेडकर देणार सामाजिक बांधीलकीचे उदाहरण...

नांदेड जिल्हयातील व शहरातील सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी यांना सामाजिक बांधिलकी जपुन श्री गणेश उत्सव-2025 मिरवणुकीत डी.जे. / डॉल्बी/ कर्कश आवाजाचे बँजोचा वापर न करता पर्यावरणपुरक ध्वनीप्रदूषण मुक्त मिरवणुक काढणे बाबत मा. श्री. राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी नांदेड आणि मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी आवाहन केले आहे.

सण उत्सव आनंदाने साजरा करतांना डिजे वाजवल्याने त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच सहन करावे लागतात. या आवाजामुळे हृदयावर वाईट परिणाम होतात. हे लक्षात घेवुन जिल्हयातील 250 गणेश मंडळानी स्वत: पुढे येऊन डिजे मुक्त गणेशोत्सव साजरा करणार असल्याचे हमीपत्र दिले आहे. ही बाब कौतूकास्पद असुन प्रत्येक सण उत्सवासाठी हा नवा आदर्श राहील, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी स्पष्ट केले. जिल्हयात पोलीस प्रशासनाने चांगली शिस्त लावली आहे. समाजात नागरीकांनी स्वत: स्वयंशिस्तीने पुढे आल्यास सर्वांचे जिवन चांगले सोपे होईल. प्रत्येक ठिकाणी कायद्याचा वापर न करता सहकार्यातुन अनेक चांगल्या गोष्टी उपक्रम आपण राबवू शकतो हे यातून दिसून येते. गणेश मंडळांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन तत्पर असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी सांगितले.

न्यायालयाच्या सुचनेनुसार आणि डिजे मुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे चांगले नियोजन केले आहे. त्याबद्दल सर्व गणेश मंडळाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आभार व्यक्त करुन अभिनंदन केले. नांदेड जिल्ह्यात उत्सव काळात शांतता राखुन उत्तम नियोजन राखले जाते. जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या नियोजनात नागरीकांचा सहभाग असल्याने चांगले नियोजन करता येते. उत्सव सण काळात डिजेचा वापर न करता पर्यावरणपूरक उत्सव साजरे करुन चांगला आदर्श निर्माण करु शकतो. उत्सव काळात गणेश मंडळांनी दिलेल्या सुचनेचे योग्य पालन करावे. विसर्जन काळात रस्ता मार्गात बदल करु नये, वेळेचे बंधन पाळावे, सर्व धर्माचा आदर करुन सण, उत्सव शांततापूर्वक साजरे करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक नांदेड मा. श्री. अबिनाश कुमार, यांनी केले आहे.

त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणुन नांदेड शहरातील 250 गणेश मंडळांनी उस्फुर्तपणे प्रतिसाद देऊन श्री गणेश विसर्जन मिरवणुक पर्यावरणपुरक ध्वनीप्रदुषणमुक्त काढण्याचा निर्णय घेतल्याने सदर गणेश मंडळाचे पदाधिकारी यांचा आज दिनांक 02/09/2025 रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे मा.श्री राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी, नांदेड आणि मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांचे हस्ते प्रमाणपत्र देवुन सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास मा.श्री राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी, नांदेड, मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, मा.श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, श्रीमती अश्विनी जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, कंधार, श्री रामेश्वर वेंजने, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, श्री प्रशात शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी, ईतवारा, नांदेड शहरातील सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी व नांदेड शहरातील गणेश मंडळाचे पदाधिकारी यांचे सह विविध गणेशमंडळाचे पदाधिकारी हजर होते.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड